# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्यात वाघोली येथील गायरान जमिनीतील अतिक्रमणे काढण्याबाबत**

**(१) १७६१४ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली तालुक्यात (जि.पुणे) वाघोली येथील गायरान जमिनीतील अतिक्रमणे काढण्यासाठी ज्येष्ठ नागरीकांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना लेखी निवेदन दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे वाघोली येथील गायरान जमिनीमध्ये असलेली अतिक्रमणे काढण्याबाबत गावातील ज्येष्ठ नागरिकांनी मा. मुख्यमंत्री व जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज केला होता.

(२) व (३) ग्रामपंचायत वाघोली अंतर्गत एकूण ५०.४४ हेक्टर इतके गायरान क्षेत्र आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीने वाघोली येथील गायरान गट नं. १४१७, १२९/१, ११७७, ११७८, १५६७, १४१३, १४१९, ११२३ या गायरान गटांची मोजणी करून घेऊन हद्दी निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

सर्वेक्षणानुसार या गायरान जमिनीमध्ये १३१० अतिक्रमण धारक आहेत. एकूण अतिक्रमण धारकांपैकी ३४० अतिक्रमणे ही दि. १/१/२०११ नंतरची आहेत.

ग्रामपंचायतीच्या नियोजित ग्रामसचिवालयाच्या जागेमधील ५७ व्यावसायिक अतिक्रमणे काढण्यात आलेली आहेत. ग्रामपंचायतीने अतिक्रमणाबाबत दि.१६/११/२०१६ व दि.३१/०५/२०१७ जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार केला असून जिल्हाधिकारी, पुणे यांनी ग्रामपंचायत वाघोली येथील अतिक्रमणे काढण्याकरिता उपविभागीय अधिकारी, हवेली यांना नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त केले आहे.

त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली व ग्रामपंचायत वाघोली यांनी उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्याशी समन्वय साधून अतिक्रमण काढणेबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत जिल्हा परिषद, पुणे यांनी कळविले आहे.

दरम्यान ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या दि. १६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील दि. ०१/०१/२०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत ग्रामपंचायत वाघोली यांना गटविकास अधिकारी यांनी दि. ११/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

---

**राज्यात शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुखांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्याबाबत**

**(२) १९९९२ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुखांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असून जळगांव जिल्हापरिषद शाळांतील केंद्र प्रमुखांची ८६ पदे दोन वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) जळगांव जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या सेवा निवृत्तीमुळे सदरची पदोन्नतीची १३ पदे रिक्त आहेत. दिनांक ०२-०२-२०१० च्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडील शासन निर्णयानुसार केंद्र प्रमुखांची ४० टक्के पदे सरळसेवेने, ३० टक्के पदे पदोन्नतीने व ३० टक्के पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षाद्वारे भरणेबाबत आदेशित केले होते. जळगांव जिल्हा परिषदेमध्ये केंद्र प्रमुखाची सरळसेवेची ६६ पदे व स्पर्धा परिक्षेची ४९ पदे रिक्त आहेत. सरळसेवेने व मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे केंद्र प्रमुखाची पदे भरण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

---

**सोमवार पेठ (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी गायरान खोटे असेसमेंट उतारे करून विक्री केल्याबाबत**

**(३) २९०६३ (२०-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमवार पेठ (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी ४३ गुंठे गायरान खोटे असेसमेंट उतारे करून विक्री करण्याचा प्रकार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र करण्याचा प्रस्ताव ८ महिने प्रलंबित ठेवण्यात येवून त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर ग्रामपंचायतीची मुदत माहे जुलै, २०१५ मध्ये संपुष्टात आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन परिपत्रक क्र.व्ही.पी.एम २६९०/(३४१७)/२१ दि.१६ डिसेंबर, १९९१ व शासन पत्र ग्रामविकास विभाग क्र.व्ही.पी.एम १३८४/१५८१/(२०५८)/२१ दि.९ एप्रिल, १९८५ नुसार सदर सदस्यांवर अपात्रतेची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास शासन, हेतुपुरस्पर ग्रामपंचायतीची मुदत संपुष्टात येईपर्यंत प्रस्ताव प्रलंबित ठेवल्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(६) तसेच शासनाने सदर सदस्यांना अपात्र ठरवून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सोमवार पेठ (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील गायरान गट नं.४६ मधील ४३.५ गुंठे क्षेत्र खोटी नोंद करून विक्री केलेबाबत दि. ०७/०७/२०१४ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनात श्री. वसंत देवताळे व इतर ग्रामस्थ यांनी तक्रार केली. तद्नुसार गट विकास अधिकारी, पन्हाळा यांच्या चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायत पदाधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला. त्यांचा खुलासा अमान्य करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ नुसार संबंधित पदाधिकारी व सदस्य यांचेवर कारवाई करण्याचा प्रस्ताव दि. ०७/०१/२०१५ रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर तक्रारीतील क्षेत्र हे गायरानातील आहे किंवा कसे याची शहानिशा करण्यासाठी ग्रामपंचायतीने दि. १७/०७/२०१४ रोजी अतितातडीची मोजणी फी मोजणी कार्यालयाकडे भरून दि. २४/१२/२०१४ रोजी सदर जागेची मोजणी करून घेतली. यामध्ये उपअधीक्षक भूमी अभिलेख, पन्हाळा, जि. कोल्हापूर यांच्या अहवालानुसार मोजणीतील हद्दी दाखविलेल्या नकाशानुसार तक्रारीत नमूद केलेले ४३.५ गुंठे क्षेत्र गायरानात येत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे खोटे असेसमेंट उतारे करून विक्री केली आहे, असे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी चौकशी अहवाल मागविणे, संबंधितास नोटीस देवून खुलासा मागणी करणे, खुलाशावर गट विकास अधिकारी यांचे अभिप्राय घेणे, ग्रामपंचायतीकडून मोजणीची कार्यवाही करणे, त्यावर विभागीय आयुक्तांचे निर्देश घेणे, सुनावण्या आयोजित करणे, कागदपत्रांची शहानिशा व पडताळणी करून कारवाईचा प्रस्ताव पाठविणे या संपूर्ण कार्यपध्दतीस कालावधी लागला आहे. परंतु प्रस्ताव प्रलंबित ठेवला आहे, असे झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

सदर ग्रामपंचायतीची मुदत दि. ३१/८/२०१५ रोजी संपुष्टात आली आहे.

(४) व (५) हे खरे आहे.

ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी ४३ गुंठे गायरान खोटे असेसमेंट उतारे करुन विक्री करण्याचा प्रकार झालेला नाही.

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने दि. २५/०७/२०१५ रोजी ग्रामपंचायतीची निवडणूक झाली व दि. ३१/०८/२०१५ रोजी सरपंच निवड होऊन नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आल्याने, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त यांनी दि. ०९/०९/२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय घेण्यास अवधी नसल्याने प्रकरण नस्तीबंद केले. तसेच माजी सरपंच, उपसरपंच अथवा सदस्य यांच्याविरूध्द मागील बॉडीच्या काळात तक्रार असेल व मागील बॉडीच्या विसर्जनानंतर पुन्हा नवीन बॉडीमध्ये सरपंच, उपसरपंच अथवा सदस्य म्हणून निवडून आले असेल तर सदरहू व्यक्तीविरूध्द कार्यवाही करता येणे शक्य नाही.

तसेच ग्रामपंचायतीकडील मासिक सभा दि. २९/०१/२०१२ ठराव क्र. ५९/१ व ५९/२ ने नोंद केलेली जागा ही गायरान मध्ये येत नसून ती श्री. नारायण नाना कदम यांच्या मालकी हक्काची असल्याबाबत नगरपालिका, पन्हाळा यांचेकडील सन १९४२ सालचा श्री.कदम यांच्या पूर्वजांचे नाव नमूद असलेला असेसमेंट उतारा व त्यांच्या कुटुंबाची वंशावळ इ. कागदपत्रे ग्रामपंचायत, सोमवारपेठ यांच्याकडे श्री.कदम यांनी सादर केली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील सावरोली खारपाडा मार्गावरील धामणी गावाजवळ असलेल्या जिल्हा परिषद मराठी शाळेतील शौचालयाची साफसफाईची कामे विद्यार्थ्यांकडून करुन घेत असल्याबाबत

**(४) ३३५४७ (२०-०६-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील सावरोली खारपाडा मार्गावरील धामणी गावाजवळ असलेल्या जिल्हा परिषद मराठी शाळेतील शौचालयाची साफसफाईची कामे विद्यार्थ्यांकडून करुन घेतली जात असल्याची तक्रार विद्यार्थ्यांच्या पालकांनी जिल्हा परिषद, रायगड प्रशासनाकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तक्रार करुनही जिल्हा परिषदेने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्जनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शौचालय सफाईची कामे करुन घेत असतांना विद्यार्थ्यांना जंतूसंसर्ग यासारखे आजार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) स्वच्छता व श्रमप्रतिष्ठा यांचे महत्व विदयार्थ्यांच्या अंगी रुजावे या उद्देशाने दि.९/७/२०१५ रोजी जिल्हा परिषद शाळा धामणी, ता.खालापूर, जि.रायगड या शाळेतील शिक्षक व विदयार्थ्यांनी शालेय परिसर व स्वच्छतागृहाची सफाई केली होती. सदर प्रकरणी सफाईची कामे केल्याने विदयार्थ्यांना जंतूसंसर्ग यासारखे आजार झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्नाटक एम्प्टा खुल्या कोळसा खाणीने संपादीत केलेल्या जमिनीच्या बाधीत कुटुंबीयांना योग्य मोबदला देण्याबाबत

**(५) ४५२१९ (२१-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेकबरांज (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये नवीन पिपरबोडी हा भाग आयुधनिर्माण वसाहतीला लागून असून नवीन पिपरबोडी भागात मागील २५ वर्षापासून वस्ती असून सुध्दा सदर वस्तीची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्ड मध्ये तत्कालीन ग्रामसचिवांनी घेतली नसल्यामुळे कर्नाटक एम्प्टा खुल्या कोळसा खाणीने संपादीत केलेल्या जमिनीचा अत्यल्प मोबदला या वस्तीतील कुटुंबीयांना मिळाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर कोळसा खाणीमुळे बाधीत कुटुंबीयांना योग्य मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भद्रावती यांच्या चौकशीअंती ग्रामपंचायत चेकबरांज अंतर्गत पिपरबोडी गावचे नमुना ८ रजिष्टर मध्ये खालीलप्रमाणे नोंदी दिसून आल्या आहेत.

| सन | नोंद असलेल्या खातेदारांची संख्या |
|---|---|
| १९९१-९५ | १८८ |
| २००१-०२ | २०१ |
| २००५-०६ | २१२ |
| २००९-१० | २३४ |
| २०११-१२ | २७२ |

(३) भूसंपादन प्रकरण क्रमांक ०७/६५/२००५-०६ मौजा चक बरांज ता. भद्रावती या प्रकरणात २२० खातेदारांची कृषक जमिन ३८२.६४ हे. आर व २९४ खातेदारांची अकृषक जमिन ३.२४ हे. आर अशी एकुण ३८५.८८ हे. आर खाजगी जमिन भूसंपादीत केली असून त्याचा मोबदला रक्कम रूपये १४,८०,५४,८४३/- एवढा आहे. भूसंपादन प्रकरण क्रमांक १५४/६५/२००५-०६ मौजा चक बरांज (गावठाण) ता. भद्रावती या प्रकरणात १४० खातेदारांचे १३४८२.८७५ चौ.मी. व घरे भूसंपादीत केली असून त्याचा मोबदला रक्कम रूपये २,५४,९७,६८९/- एवढा आहे.

सदर जमिनीचा / मालमत्तेचा मोबदला त्यावेळचा बाजार भाव व भूसंपादन अधिनियमातील तरतुदी या नुसार निवाडा पारीत करून संबंधीत जमिनधारकांना (शेतकरींना) मोबदला अदा करण्याची कार्यवाही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), चंद्रपूर यांच्याकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर (जि.पालघर) पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील**
**प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत**

**(६) ५२५७९ (०६-०५-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) पंचायत समितीच्या तत्कालिन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या अधिकार कक्षेबाहेर जावून दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ रोजी ५० शिक्षकांची पदे भरुन सदर शिक्षकांना अधिकृत करण्यासाठी २०-२२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांची अतिरिक्त ठिकाणी बदली करुन त्यांना अतिरिक्त ठरविल्याप्रकरणी संबंधित शिक्षकांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१४, दिनांक २० ऑक्टोबर, २०१४, दिनांक १४ जानेवारी, २०१५ व दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१५ च्या तक्रार अर्जाद्वारे मुख्य सचिव, प्रधान सचिव (ग्रामविकास), मा.मंत्री (ग्रामविकास) व मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना कळवून हा गैरकारभार निदर्शनास आणला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने प्रधान सचिव (ग्रामविकास) यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात सुनावणी घेऊन तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांच्या गैरकारभारामुळे ज्या शिक्षकांवर अन्याय झाला तो दूर करुन त्यांचे थकित वेतन तात्काळ अदा करण्याचे आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधान सचिव यांच्या निर्देशाप्रमाणे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली असून अंमलबजावणीसुध्दा झाली आहे.

(३) चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) संबंधितांची विभागीय चौकशी सुरु आहे.

---

**"मेरा बु" (ता.चिखली, जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकानी केलेला गैरव्यवहार**

**(७) ५६७९६ (०१-०९-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "मेरा बु" (ता.चिखली, जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक जी.टी. आटोळे यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी होऊन फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांना दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१९) :** (१) होय. असे निवेदन प्राप्त झाले होते. तथापि या गावच्या ग्रामसेवकाचे नांव जी.टी. आटोळे नसून सी.टी. आटोळे असे आहे.

(२) होय. ग्रामनिधी व पाणीपुरवठा निधी मध्ये तसेच इतर योजनेअंतर्गत अफरातफर व नियमबाहय खर्च झाल्याचे आढळून आले. सरपंच, सचिव व ग्राम पंचायत कर्मचारी यांचेकडून एकूण रू. १०,९४,१५६/- इतकी रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. त्यापैकी ग्रामसेवकांकडून रू ५,३७,७२८/- इतकी वसूल पात्र रक्कम निश्चित झाली आहे.

(३) व (४) ग्राम सेवकाला दि. १०.०६.२०१५ रोजी निलंबित करण्यात आले असून सध्या संबंधित ग्रामसेवक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहे. श्री. आटोळे, तत्कालीन ग्रामसेवक यांच्या सेवा पुस्तकात सेवानिवृत्ती उपदान व इतर मिळणा-या लाभाच्या रक्कमेतून रू.५,३७,७२८/- इतकी वसुलपात्र रक्कम वसुल करण्याबाबतची नोंद घेण्यात आली आहे. तसेच, तहसिल कार्यालय, चिखली यांच्याकडे महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२९ नुसार तसेच, जमीन महसूलीच्या थकबाकीप्रमाणे सदर रक्कम वसूलीचा प्रस्ताव सादर केला आहे.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील बेलथर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) ६५२३७ (०५-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलथर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदामुळे मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कळमनुरी तालुक्यातील बेलथर येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये प्राथमिक शाळा बेलथर येथे शिक्षकांच्या एकूण ०४ मंजूर पदांपैकी ०१ पद रिक्त होते. ते रिक्त पदही भरण्यात आले आहे. या शाळेत रिक्त पद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयात पर्यटन विकासासाठी 'स्वदेश दर्शन' योजना सुरू करण्याबाबत

**(९) ६५९१७ (२७-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयाच्या धर्तीवर रत्नागिरी जिल्हयात पर्यटन विकासासाठी 'स्वदेश दर्शन' योजना सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय व त्यातून पर्यटकांना कोणकोणत्या सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-०४-२०१९) :** (१) व (२) केंद्र शासनाच्या स्वदेश दर्शन योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या रुपये ९८.८७ कोटीच्या विकास आराखड्यास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. अद्याप सदर आराखड्यास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खानापूर (जि.सांगली) जिल्हा परिषद गटामधील दहा ते बारा जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(१०) ६८४४५ (२७-०१-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) जिल्हा परिषद गटामधील दहा ते बारा जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात शिक्षकांच्या रिक्त असणाऱ्या वीस जागांपैकी एकोणीस जागा खानापूर गटातील केंद्रातच असल्याने यांसदर्भात वरिष्ठांकडे वेळोवेळी रिक्त पदे त्वरीत भरण्यासंबंधी मागणी करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होऊन दोन महिने पूर्ण झाले असून शिक्षकांच्या रिक्त जागांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) खानापूर पंचायत समिती अंतर्गत ३२ पदे रिक्त असून त्यापैकी १८ रिक्त पदे खानापूर गटातील आहेत. सदर रिक्त पदे आंतरजिल्हा बदलीने तसेच सर्वसाधारण बदलीने भरण्याची तजवीज ठेवलेली आहे. मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी अन्य शाळांमधील शिक्षकांकडून अध्यापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

---

### रायगड जिल्हा परिषदेच्या ३९ प्राथमिक शाळा विद्यार्थ्यीअभावी बंद झाल्याबाबत

**(११) ७४०६१ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या ३९ प्राथमिक शाळा विद्यार्थ्यां अभावी बंद पडल्या असून एक ते पाच इतकी विद्यार्थी संख्या असलेल्या २११ शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयात शिक्षकांची एकूण ५२८ पदे रिक्त असल्याने मुले शाळेत नियमित येऊनही त्यांना शिकवायला पुरेसे शिक्षक नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे अद्यापपर्यत न भरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने सदरहू जिल्हयातील जिल्हा परिषदांच्या शाळांचा दर्जा सुधारून अद्यावत शिक्षण उपलब्ध करून देण्यासह उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) जिल्हा परिषद रायगड अंतर्गत शिक्षकांच्या रिक्त पदांवर नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, शाळांचा दर्जा सुधारुन विदयार्थ्यांना अदययावत शिक्षण उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिटवाडी (ता.कर्जत, जि.अहदमनगर) येथे जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याबाबत**

**(१२) ७७०५८ (१९-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परिटवाडी (ता.कर्जत, जि.अहदमनगर) येथे जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी दोन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांना निलंबित केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार या मुख्याध्यापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी संबंधित मुख्याध्यापकास निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द पोलिस स्टेशन, कर्जत, जि.अहमदनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) चौकशी अधिकारी यांचा अंतिम अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामोद, जळगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ८९ शाळांमध्ये मुख्याध्यापकांसह शिक्षकांची तब्बल ९७ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) ७७१११ (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामोद, जळगांव (जि.बुलढाणा) तालुक्यामधील ८९ शाळांमध्ये मुख्याध्यापकांसह शिक्षकांची ९७ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पंचायत समिती अंतर्गत उक्त ८९ प्राथमिक व माध्यमिक शाळा येत असुन या आदिवासी तालुक्यातील शाळांकडे प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे मुख्याध्यापकांसह शिक्षकांच्या ४१७ पदांपैकी ९७ पदे रिक्त असल्याने एका शिक्षकांवर दोन-दोन वर्ग सांभाळण्याची जबाबदारी येत असून विदयार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता ज्या शाळांमध्ये शिक्षकांची सर्व पदे भरण्यात आलेली आहेत तेथील शिक्षकांची दि.३०/४/२०१७ पर्यंतच्या कालावधीकरीता तात्पुरती नियुक्ती द्विशिक्षकी व तीन शिक्षकी शाळांमधील रिक्त पदांवर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोली पूलाची (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पथदिवे बंद असल्याबाबत**

**(१४) ७७९४८ (१९-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोली पूलाची (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील सुमारे पाचशे पथदिवे बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पथदिवे बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पथदिवे तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शिरोली पुलाची येथे १५०० पथदिवे असून त्यापैकी १५० पथदिवे माहे डिसेंबर, २०१६ च्या दरम्यान बंद होते. सदर कालावधीमध्ये १५० पथदिवे बंद होते.

(२) ग्रामपंचायत विद्युत कर्मचारी विकीराज नथुराम पाटील यांचे अपघाती निधन झाल्याने सदरचे पथदिवे बंद होते.

(३) ग्रामपंचायत शिरोली पुलाची यांनी सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा शिरोली यांना दि. १८/१०/२०१६ च्या पत्रानुसार सदर पथदिवे महावितरणच्या कर्मचा-यामार्फत बसविणेची मागणी केलेली होती. परंतु सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा शिरोली यांनी सदरचे काम ग्रामपंचायत मार्फत प्राधिकृत व्यक्तीकडून करून घ्यावे असे कळविले होते. त्यानुसार, ग्रामपंचायत शिरोली पुलाची यांनी मे. शिवम इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर्स यांना पथदिवे बसविणेबाबत प्राधिकृत करून माहे डिसेंबर ते माहे जानेवारी २०१७ अखेर १५० (१००%) पथदिवे बसविणेचे कामकाज करून घेतलेले आहे. त्यानंतर ग्रामपंचायतीने मासिक सभा ठराव क्र. ७६/८, दि. १७/०७/२०१७ च्या पत्रान्वये श्री.सुर्यकांत नामदेव चोपडे यांची विद्युत कर्मचारी म्हणून नियमित नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थी गैरहजर राहिल्यास वर्ग शिक्षकाचे, केंद्र प्रमुखाचे आणि बीटमधील शाळांतील विद्यार्थी संख्येनुसार विस्तार अधिका-याचे वेतन कमी करण्याबाबत**

**(१५) ८१३४७ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीला आळा घालण्यासाठी शाळेत पटसंख्येवर नोंदविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी जर पाच टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर राहिल्यास वर्ग शिक्षकाचे, शाळांतील संख्येनुसार केंद्र प्रमुखाचे आणि बीटमधील शाळांतील विद्यार्थी संख्येनुसार विस्तार अधिका-याचे वेतन कमी करण्याचे परिपत्रक जळगाव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकामुळे राज्यातील सर्व शिक्षकांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदमध्येही शाळेतील पटसंख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गाची आंतरजिल्हा बदलीमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(१६) ८२९३७ (१४-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गाची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया मागील ८ वर्षांपासून बंद असून आंतरजिल्हा बदलीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याने या प्रक्रियेची सविस्तर चौकशी करावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सचिव, ग्रामविकास यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी अमरावती जिल्हा परिषदेमार्फत चौकशी समिती नेमण्यात आली असून, चौकशीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील सरपंच आणि नगरसेवक ग्रामपंचायतीचे काम ई टेंडरिंगद्वारे करीत असल्याबाबत**

**(१७) ८४९०१ (१२-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीन लाखापेक्षा अधिकच्या कामांना ई टेंडरिंग बंधनकारक असतांना जि.पुणे अंतर्गत ग्रामपंचायतीचे सरपंच आणि नगरसेवकांची डिजिटल सिग्निचर तयार नसल्याचे तांत्रिक कारण देऊन ८५ टक्के कामे ई टेंडरिंग न करता केल्याचे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे कळविले असतांनासुध्दा आतापर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

पुणे जिल्हयामध्ये १३९७ ग्रामपंचायतींपैकी १३९७ ग्रामपंचायतीच्या सरपंचांची डिजीटल सिग्निचर प्राप्त असून सर्व ग्रामपंचायतींमध्ये आवश्यकतेनुसार ई-टेंडरिंगचे काम सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विकास कामे ठेकेदारांकडून विहित वेळेत पूर्ण करुन घेण्याबाबत**

**(१८) ८७३८४ (२३-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात करण्यात येणारी विकास कामे ई निविदेद्वारे ठेकेदारांकडून करण्यात येतात मात्र सदर विकास कामे परवडत नसल्याने मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हानिहाय किती विभागाची विकास कामे अपूर्ण आहेत,
(३) असल्यास, राज्यात ई निविदेद्वारे हाती घेतलेली विकास कामे ठेकेदारांकडून विहित वेळेत पूर्ण कण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०३-२०१९) :** (१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत बिंदू नामावली रोस्टर प्रणाली अद्यावत करण्याबाबत**

**(१९) ८९०१५ (११-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत बिंदू नामावली रोस्टर ची नियमावली निश्चित केली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नांदेड जिल्हा परिषदेचे अद्याप रोस्टर अद्यायावत न केल्यामुळे येथील शिक्षकांच्या बदल्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोस्टर प्रणाली अद्यावत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय खरे आहे.
(२) होय.

(३) नांदेड जिल्हा परिषदेने तयार केलेल्या बिंदू नामावलीस काही संघटनांनी हरकत घेतल्याने शासनाने चौकशीसाठी समिती गठीत केली. समितीने सादर केलेल्या अहवालावरुन सुधारीत बिंदू नामावली विभागीय आयुक्त (मा.व क.), औरंगाबाद यांनी मराठी व उर्दू माध्यमाची बिंदू नामावली दि.२२/५/२०१८ रोजी मंजूर केली आहे. या बिंदू नामावलीस एका संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेमधील अपंग प्रवर्गाच्या यादीत झालेला गैरकारभार**

**(२०) ८९११० (११-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेतील अपंग कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती अपंग प्रवर्गातून झालेली नाही त्यांचीच नावे यादीत आल्याने अंध, अपंग व कर्णबधीर कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असून या पदोन्नतीची चौकशी करावी अशी मागणी जिल्हा परिषदेतील अपंग कर्मचाऱ्यांनी मा.शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार अंध, अपंग व कर्णबधीर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासह पदोन्नतीच्या यादीत गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) शिक्षण (प्राथमिक) विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून सन २०१० पासून अपंग (अंध, कर्णबधीर) प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यामुळे पदोन्नती देण्यामध्ये गैरप्रकार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच अपंग प्रमाणपत्र सादर करुन ज्या शिक्षकांची सन २०१६ मध्ये सर्वसाधारण व खास बाब बदली झालेली आहे अशा शिक्षकांचे अपंग प्रमाणपत्र तपासणी करण्यात आलेले आहे. ज्या शिक्षकांचे अपंग प्रमाणपत्र व अपंगत्व ग्राहय धरण्यात आलेले नाही अशा शिक्षकांना चौकशीचे अधिन राहून जिल्हयांतर्गत बदली करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहारा (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील अपंग शिक्षकांच्या नियुक्तीबाबत**

**(२१) ९४१८० (२१-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (जि.यवतमाळ) शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषद शाळेतील अतिरीक्त शिक्षकाचे समायोजन करण्यात येत असतांना लोहारा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत एकूण १९ शिक्षकांपैकी १६ अपंग शिक्षक असल्याचे दिनांक १९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका शाळेमध्ये १६ अपंग शिक्षकांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, लोहारा (यवतमाळ) येथे सन २०१६ च्या संच मान्यतेनुसार एकूण २० शिक्षकांची पदे मंजूर आहेत. यापैकी ९ पदांवर अपंग शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षकांच्या समुपदेशन बदली प्रक्रियेमध्ये सदर शिक्षकांनी या शाळेची निवड केल्याने त्यांना पदस्थापना देण्यात आली आहे. पंचायत समिती, यवतमाळ अंतर्गत चौकशी समितीने सदर शाळेला प्रत्यक्ष भेट देवून अपंग शिक्षकांचे प्रमाणपत्र व अध्यापनाबाबत चौकशी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भेली (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथील जिल्हापरिषदेच्या**
**मुख्याध्यापकानी आत्महत्या केल्याबाबत**

**(२२) ९५३८३ (०३-०१-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेली (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथील जिल्हापरिषदेच्या मुख्याध्यापकांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याध्यापकाने शाळेतील शिक्षकांच्या त्रासामुळे आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर शिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

---

**औढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील येहळेगाव सोळंके जिल्हा प्रशाळेतील शिक्षकांच्या गैरवर्तनाबाबत**

**(२३) ९६९०७ (०३-०१-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील येहळेगाव सोळंके जिल्हा प्रशाळेत शिक्षक उशीरा शाळेत येत असल्यामुळे येथील ग्रामस्थांनी शाळेला कूलूप लावले असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले असून याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तक्रारीचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर शिक्षकांवर कारवाई करुन या शाळेत बायोमेट्रीक पध्दतीची मशीन लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित जिल्हा प्रशाळेबाबत गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती औढा (ना) यांच्याकडून गैरहजर शिक्षकाची माहिती मागवून गैरहजर शिक्षकांना सक्त ताकीद देवून त्याची नोंद संबंधितांच्या मूळ सेवापुस्तिकेत घेण्यात आली आहे.
(३) दिनांक २१ जून, २०१८ रोजी शिक्षकाचे उपस्थितीकरीता बायोमेट्रीक मशीन बसविण्यात आलेले असून शिक्षकांची उपस्थिती नोंदविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तोरणे बु. (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरकारभार**

**(२४) ९७९४४ (२२-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील वडगाव बांडे येथील विधवा संगिता पोपट गरदरे यांना येथील खेड तालुक्यातील तोरणे बु. येथील ग्रामपंचायतीने मृत्यूचा दाखला देऊन मयत ठरविल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१९) :** (१) नाही.

कै. संगीता पोपट गरदरे यांचा मृत्यू दिनांक ११/०६/२००९ रोजी तोरणे बु. ता. खेड येथे आजारपणामुळे झाला. याची नोंद मयत संगीता यांचे दिर श्री.विठ्ठल गिताजी गरदरे यांनी दि.१८/६/२००९ रोजी दिलेल्या अर्जावरून ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आली असून त्यानुसार मृत्यू दाखला देण्यात आलेला आहे.
(२) श्री.दशरथ गेनबा गरदरे रा. वडगांव बांडे, ता.दौंड, जि.पुणे यांनी एकत्रित कुटुंबातील जमीन हडपण्याच्या उद्देशाने श्रीम. संगीता तुकाराम जांभळकर, रा.आलेगाव पागा, ता.शिरूर, जि.पुणे याच कै. संगीता पोपट गरदरे असल्याचे भासवून संगनमताने खोटे पुरावे सादर केले असल्याचे निदर्शनास आल्याने मयत संगीता पोपट गरदरे यांचे दिर श्री.विठ्ठल गिताजी गरदरे यांनी याविरूध्द यवत पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र. ४२/२०११, दि.४/३/२०११ रोजी दाखल केला. सदर प्रकरण आता प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, दौंड यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ठ (फौजदारी खटला, आरसीसी नं. ५८८/२०११) आहे.
(३) ग्रामपंचायतीने दिलेला दाखला योग्य असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्याच्या मागासवर्गीय (जातीच्या) यादीतील इतर मागासवर्गीय यादीमध्ये 'लखेरा' या जातीच्या इंग्रजी शब्दलेखनात (Spelling) चुक झाल्याबाबत

**(२५) १०१४५२ (१८-०१-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या मागासवर्गीय (जातीच्या) यादी दिनांक २६ सप्टेंबर, २००८ मध्ये इतर मागासवर्गीय यादीमध्ये अ.नु.क्र.९१ वर 'लखेरा' या जातीच्या इंग्रजी शब्दलेखनात (Spelling) चुक झाल्यामुळे दुरुस्ती करण्याबाबत माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास स्मरणपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जातीच्या इंग्रजी शब्दलेखनातील (Spelling) चूक दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्यती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिक्षकांच्या जिल्हा परिषदेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नियमबाह्य निवड झाल्याबाबत**

**(२६) १०६५०२ (०९-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांजा (जिल्हा रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हा परिषदेतर्फे सन २०१७ मध्ये आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करतांना नियमबाह्य निवड झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लांजा पंचायत समिती शिक्षण विभागाने शाळेवर हजर नसलेल्या शिक्षकांची व उसणवारी तत्वावर पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकाची निवड केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गट शिक्षणाधिकारी यांनीही सदर प्रस्ताव पाठवितांना प्रतिकुल शेरा दिलेला असतांना व स्थायी समितीने सुध्दा या विषयी आक्षेप घेतलेला असतांना पुरस्कार वितरीत करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्हा परिषदेमार्फत शासन निकषानुसार तालुकास्तरावरील गठीत केलेल्या समितीमार्फत छाननी करुन जिल्हा स्तरावर निवडीचे प्रस्ताव सादर केले जातात. जिल्हा स्तरावरील समितीमार्फत शासनाने विहित केलेल्या गुणदान तक्त्यानुसार गुण दिले जातात व प्रत्येक तालुक्यातून एक व जिल्हयासाठी एक विशेष पुरस्कारासाठी शिक्षकांची निवड केली जाते. त्यामुळे निवड करताना नियमबाहय निवड झालेली नाही. लांजा गटातील शिक्षकास त्यांचे कामकाजाकरीता मिळालेले सरासरी गुण जास्त असल्याने त्यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हा

समितीतर्फे निवड करण्यात आलेली आहे व त्यास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे मान्यतेनंतर पुरस्कार वितरण करण्यात आलेले आहेत. स्थायी समितीने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यात आलेले आहे.

---

**अमरावती जिल्हयाला विकासकामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२७) १०७००३ (०५-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयाला विकासकामासाठी सन २०१५-१६ ते २०१६ पर्यत सुमारे १७० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला त्यापैकी तब्बल ८० कोटीही खर्च होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जाचक अटींमुळे ग्रामपंचायतीकडून हा निधी वापरण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार अमरावती विकासकामांचा प्राप्त झालेला निधी वापरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१९) :** (१) होय.

(२) नाही.

(३) निधी खर्च होत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र पाणी परिषदेने सादर केलेले आंतरखोरे पाणी**
**परिवहनाचे १९ प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) १०७८९७ (१०-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता महाराष्ट्र पाणी परिषदेने दोन वर्षापुर्वी सादर केलेले आंतरखोरे पाणी परिवहनाचे १९ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्तावावर अदयापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत तातडीने निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०३-२०१९) :** (१) नाही.

पाणी परिषदेने सादर केलेल्या १९ पाणी परिवहन प्रस्तावापैकी गोदावरी खो-यातील ८ तापी खो-यातील ६ व कृष्णा खो-यातील ५ प्रस्ताव आहेत. सदर आंतरखोरे पाणी परिवहन प्रस्तावाद्वारे केलेल्या सूचनांचा विचार खोरेनिहाय एकात्मिक जल आराखडा तयार करतांना करणेत आला आहे. तसेच खो-याअंतर्गत पाणी वळविणेकरिता पाणी उपलब्धतेनुसार वळण योजनांचा समावेश जल आराखडयात करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशाच्या अधीन राहून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील फुफेरे प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत

**(२९) १११३४९ (०६-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील डोंगराळ परिसरातील फुफेरे प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला सहायिकेला मागील सहा महिन्यांपासून रत्नागिरीमधील जिल्हा प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्ती देण्यात आल्याने फुफेरे परिसरात उपचारासाठी मोठी गैरसोय निर्माण झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त फुफेरे आरोग्य केंद्रात रिक्त कर्मचारी पदांमुळे मोठया प्रमाणात रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, फुफेरे प्राथमिक आरोग्य केंद्रात एन.आर.एच.एम. अंतर्गत आरोग्य सहाय्यक (महिला) या कार्यरत आहेत.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत पारिवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा ठाकूरपाडा (आळखिवली) केंद्र कवाड या शाळेला अवघड क्षेत्र घोषित करण्याबाबत**

**(३०) ११२३४१ (०६-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत पारिवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) या क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा ठाकूरपाडा (आळखिवली) केंद्र कवाड, ता.भिवंडी या शाळेला अवघड क्षेत्र घोषित करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, ठाणे यांना स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. शासन निर्णय दि.२७/२/२०१७ मधील धोरणात्मक तरतुदीनुसार जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अवघड क्षेत्र व सर्वसाधारण क्षेत्र घोषित करावयाचे आहे. घोषित केलेल्या क्षेत्रात कोणता बदल करणे वा त्या बाबत काही आक्षेप असल्यास विभागीय आयुक्तांकडे दाद मागता येते.

---

**तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत जळगांव मध्यम प्रकल्प विभाग-१ जळगांव विभागातील पाचोरा तालुक्यातील नविन प्रस्तावित कामे मंजूर करुन निधी मिळण्याबाबत**

**(३१) ११३०५४ (१२-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत जळगांव मध्यम प्रकल्प विभाग-१ जळगांव विभागातील पाचोरा तालुक्यातील नविन प्रस्तावित कामे मंजूर होऊन निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले असता का.सं. (तापी) यांना कार्यवाही करण्याची निर्देश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाचोरा तालुक्यातील नविन प्रस्तावित कामे मंजूर करुन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१९) :** (१) होय.
(२) नाही. पाचोरा तालुक्यातील बहूळा प्रकल्पाची वितरिका क्र.३, मायनर ३ व मायनर ६ चे अंशत: मातीकाम व बांधकामे भुसंपादनामुळे अपूर्ण होती. सद्यस्थिती भुसंपादन कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येईल.
(३) बहुळा प्रकल्पावर प्रकल्प अहवालापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून, सदर प्रस्तावाच्या सक्षम स्तरावरील मान्यतेनूसार व निधी उपलब्धतेनूसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावातील कामे हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयासाठी पाणीटंचाई निवारणार्थ केलेल्या उपाययोजनेचा निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ११६००० (०७-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयासाठी सन २०१६-१७ मध्ये पाणीटंचाई निवारणार्थ केलेल्या उपाययोजनेचा निधी टँकर मालक व खासगी विहीर मालकांना पंचायत समितीकडून अद्याप देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टँकर मालक व खासगी विहीर मालक यांना तात्काळ निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१९) :** (१) होय.
(२) निधी तात्काळ वितरणाबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना जा.क्र./ वित्त् /अंकेक्षण १०/०७/२०१७ व जा.क्र.ग्रापापू/जिपवा/लेखा/पाणी टंचाई/३४/२०१८ दिनांक ०६/०१/२०१८ नुसार सूचना देण्यात आलेले आहेत.निधी वितरण करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांना एमएससीआयटी प्रशिक्षणाची मुदत वाढवून देण्याबाबत**

**(३३) ११६९८४ (२०-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओरोस (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील शिक्षक अधिवेशनात एमएससीआयटी प्रशिक्षणाची शिक्षकांसाठी असलेली मुदत वाढवली जाईल असे आश्वासन मा.ग्रामविकास मंत्री व मा.शालेय शिक्षणमंत्री यांनी दिले असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांसाठी एमएससीआयटी प्रशिक्षणाची मुदत माहे डिसेंबर, २००७ पर्यन्त होती परंतु अनेक शिक्षक दुर्गम भागात असल्याने तसेच ग्रामीण भागात प्रशिक्षण केंद्राची उपलब्धता नसल्याने ब-याच शिक्षकांना हा अभ्यासक्रम पूर्ण करता आला नाही त्यामुळे मुदत संपल्यानंतर राज्यातील लाखो शिक्षकांनी एमएससीआयटीचे प्रशिक्षण पूर्ण केले परंतू मुदतीनंतर हे प्रशिक्षण घेतल्यामुळे संबंधित शिक्षकांना वेतनवाढ नाकारण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१), (२) व (३) राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी एमएससीआयटी प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्याचे बंधन हे धोरण राज्य शासनाने तयार केले असून, त्याबाबतचे आदेश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेले आहेत.

ओरोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील शिक्षक अधिवेशनात मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानंतर त्यानुषंगाने उचित निर्णय घेण्यासंदर्भात राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ग्रामविकास विभागांतर्गत येणा-या जिल्हा परिषदांच्या शाळांच्या बदली प्रकिया ऑनलाईन करण्याबाबत**

**(३४) ११८३५२ (२४-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राम विकास विभागांतर्गत येणा-या जिल्हा परिषदांच्या शाळांच्या बदली प्रक्रियेत पारदर्शकता यावी म्हणून ही प्रकिया ऑनलाईन करण्यात आली आहे मात्र सर्व्हर डाऊन असल्यामुळे शिक्षकांना अर्ज करतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे दिनांक २० एप्रिल,२०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक शिक्षकांनी अर्ज भरण्यासाठी रात्रभर जागून वाट पाहिली तर अनेकांनी सायबर कॅफेच्या बाहेर रांगा लावल्या असल्याने हे अर्ज करण्याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी पंचायत समितीच्या कार्यालयात मार्गदर्शन केंद्र उभारण्यात यावे अशी सूचना असतांनाही बहुतांश समिती कार्यालयांमध्ये हे केंद्र उभारण्यात न आल्याने संबंधित शिक्षकांची गैरसोय झाली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मार्गदर्शन केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद शाळांच्या ऑनलाईन बदली प्रक्रियेअंतर्गत संगणक सर्व्हर डाऊन होण्याची बाब तात्पुरत्या स्वरुपाची असून, तांत्रिक कारणामुळे घडली आहे. तदनंतर झालेल्या दुरुस्तीनंतर सर्व्हर डाऊन समस्या उदभवलेली नाही. जिल्हा परिषदांचे बदलीपात्र शिक्षक अर्ज भरण्यापासून काही तांत्रिक अडचणींमुळे उपेक्षित राहू नयेत याकरीता संबंधित पंचायत समितीमार्फत मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## वसईतील (जि.पालघर) नाळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांशी गैरवर्तन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) ११९५४२ (३१-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसईतील (जि.पालघर) नाळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये स्थानिक समाजकंटक तरुणांकडून क्रिकेटचे सामने भरविण्यात येत असून त्यामुळे शाळेच्या भिंतीचे प्लास्टर, शाळेचे छप्पर निघाले आहे तसेच समाजकंटक तरुणांकडून शाळेतील विद्यार्थांना दमदाटी, शिविगाळ करणे, शाळेतील आवारात मद्यपान करणे, अश्लिल हावभाव करुन विद्यार्थ्यांना नाहक त्रास देण्याचे प्रकार सुरु असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर समाजकंटक तरुणांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत चौकशीअंती या शाळेच्या पटांगणात केवळ क्रिकेटचे सामने खेळले जात असल्याचे आढळून आल्याने, असे सामने खेळण्यास आता प्रतिबंध केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांच्या योग्य पद्धतीने बदल्या करण्याबाबत**

**(३६) ११९९०१ (२४-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांच्या बदली आदेश यामध्ये अनेक घोळ असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपलब्ध जागांपेक्षा अधिक शिक्षकांना एका शाळेवर रुजू होण्याचे आदेश, बंद शाळेत बदली असे अनेक प्रकार बदल्यांमध्ये घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार योग्य पद्धतीने शिक्षकांच्या बदल्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१९) :** (१) नाही.
(२), (३) व (४) राज्यातील शिक्षकांच्या ऑनलाईन बदली प्रकरणी काही ठिकाणी मॅपिंगच्या तांत्रिक चुकांमुळे अशा तुरळक बाबी निदर्शनास आल्या. मात्र त्या तात्काळ दुरुस्त करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ओबीसी समाजाचा घरकुलाचा कोटा वाढवून देण्याबाबत**

**(३७) १२०२७२ (२०-०७-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ओबीसी वगळता मागास प्रवर्गातील इतर घटकांना मोठ्या प्रमाणात घरकुलाचे लाभ देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मात्र राज्यात ५५% हून अधिक सर्वाधिक लोकसंखेने असणाऱ्या ओबीसी समाजाला अत्यल्प प्रमाणात घरकुलाचा कोटा निश्चित करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ओबीसी समाजाचा घरकुलाचा कोटा वाढवून देण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग कल्याण या नविन विभाग मार्फत सद्या ओबीसी समाजासाठी घरकुलाची कोणतीही योजना राबवली जात नाही.
(२), (३) व (४) प्रश्नं उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयात पर्यटकांकरीता मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) १२०९५३ (२०-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात असलेल्या पर्यटन माहिती केंद्रामध्ये नागरिकांना केवळ पर्यटन स्थळांचे माहितीपत्रक व रिसॉर्ट बुकिंगचे काम करीत आहेत तसेच कोल्हापूर जिल्हयातील सहयाद्रीच्या पर्वतरांगा, सभोवती घनदाट हिरवीगार झाडे, दुर्मिळ वनौषधांचे भांडार आणि उंच पठारावर एकाच दगडावर कोरलेली भव्य पांडवकालीन लेणी, बोरबेट येथील रम्य मोरजाईचे पठार पर्यटन विकासाच्या प्रतिक्षेत असून या ठिकाणी मुलभुत सुविधांचा अभाव असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार याठिकाणी पर्यटकांकरीता मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०३-२०१९) :** (१) नाही.
(२) कोल्हापूर शहरात असलेल्या माहिती केंद्रामध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत पर्यटकांना पर्यटनस्थळांचे माहितीपत्रक व रिसॉर्ट बुकिंगची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच कोल्हापूर जिल्हयातील सह्याद्रीच्या पर्वतरांगा, घनदाट हिरवीगार झाडे, दुर्मिळ वनौषधांचे भांडार आणि उंच पठारावर एकाच दगडावर कोरलेली भव्य पांडवकालीन लेणी अशा ठिकाणी पर्यटनाची कामे वन विभागाकडून प्रचलित नियमातील तरतुदीस अधिन राहून करण्यात येतात. सन २०१५-१६ मध्ये मोरजीं देवी पठारावर जिल्हा वार्षिक योजनेतून पायऱ्या टप्पे बांधणे, विहिर ते भवानी मंदिर पायऱ्या टप्पे बांधणे, नैसर्गिक पायवाट व कचराकुंडी इत्यादी पर्यटन विकासाची कामे केलेली आहेत. तसेच सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून बोरबेट मंदिर परिसरात नळपाणी पुरवठा दाबनलिका बसविणे, मंदिर परिसरात स्त्री

व पुरुष प्रसाधनगृह बांधणे, पर्यटक बैठक व्यवस्था करणे, तारेचे कुंपण करणे, सुसाईड पॉईंट जवळील सूर्यास्त दर्शन पॉईंटवर सुरक्षा रेलिंग करणे इत्यादी पर्यटन विकासाची कामे केलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात कोटयवधी खर्च करुन अर्जुना मध्यम प्रकल्प, काजिर्डाचा जामदा प्रकल्प, ताम्हाणे, तळवडे, वाळवड व पाचल येथे धरण प्रकल्प उभारले जात असून या धरण प्रकल्पापैकी कांही प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(३९) १२१२७० (२०-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात कोटयावधी रुपये खर्च करुन अर्जुना मध्यम प्रकल्प, काजिर्डाचा जामदा प्रकल्प, ताम्हाणे ,तळवडे,वाळवड व पाचल येथे धरण प्रकल्प उभारले जात असून या धरण प्रकल्पापैकी कांही प्रकल्पाचे काम सुरु आहे तर कांही प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्याचे नुकतेच माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणापैकी काही धरणांमध्ये पाण्याचा साठा होऊनही कालव्या अभावी या पाण्याचा उपयोग्य शेतक-यांना करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून या धरणातील पाण्याचा उपयोग शेतक-यांना झालेला नसल्याने शेतकरी नाराज झाले आहेत, हे ही खेर आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त प्रकल्पाचे काम तात्काळ पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे. महामंडळांतर्गत अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प, जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प, तळवडे ल.पा. प्रकल्प व ताम्हाणे (चव्हाणवाडी) ल.पा. प्रकल्प, हे प्रकल्प बांधकामाधीन असून पाचल येथील दिवाळवाडी ल.पा. प्रकल्प हा पूर्ण झालेला आहे.

वाळवडमूर ल.पा. प्रकल्प योजना मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यकक्षेत येत असून, सद्यस्थितीत सदर प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. वरीलपैकी बांधकामाधीन अर्जुना व तळवडे प्रकल्पांमध्ये पाणीसाठा करण्यात येत असून जामदा व चव्हाणवाडी प्रकल्पांमध्ये अद्याप पाणीसाठा निर्माण झालेला नाही. अर्जुना प्रकल्पांतर्गत डावा कालवा कि.मी. ४ पर्यंत सिंचनासाठी व तळवडे धरणात पाणी साठा वाढविणेसाठी माहे मे-२०१८ मध्ये पाणी सोडण्यात आले होते. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या मागणी नुसार नदी काठा वरील गावांतील पाणी दुर्भिक्ष्य कमी करणेसाठी अर्जुना नदीत ही पाणी सोडण्यात आले होते.

वाळवड धरणाचे काम प्रगतीपथावर असून, योजनामध्ये पाणीसाठा निर्माण झालेला नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

अर्जुना व तळवडे या बांधकामाधीन प्रकल्पांमध्ये पाणीसाठा करण्यात येत असून अर्जुना प्रकल्पांतर्गत डावा कालवा कि.मी. ४ पर्यंत सिंचनासाठी व तळवडे धरणात पाणी साठा वाढविणेसाठी माहे मे, २०१८ मध्ये पाणी सोडण्यात आले होते.
(४) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प केंद्र शासनाच्या प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजनांतर्गत उपलब्ध निधीतून डिसेंबर २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. धरणाचे काम पुर्ण झाले असुन कालव्यांची ७०% कामे पुर्ण झाली आहेत, उर्वरीत कालवे बंदिस्थ नलिका प्रणालीद्वारे करण्याचे प्रस्तावित असून कामांच्या निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहेत. सन २०१८-१९ मध्ये डावा कालवा कि.मी. १ ते १६ व उजवा कालवा कि.मी. १ ते १७ मधील कालवे व वितरण व्यवस्था पुर्ण करुन सिंचन क्षेत्र ओलीताखाली आणण्याचे नियोजन आहे. तळवडे प्रकल्पाचे २२९ हे. क्षेत्र अर्जुना प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरुन बंदिस्त नलिका प्रणालीव्दारे सिंचन करण्याचे नियोजन आहे. जामदा व चव्हाणवाडी प्रकल्पांची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. “वाळवड” योजनेचे द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेचे अंदाजपत्रक जलसंधारण विभागाच्या सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार सुधारीत करुन सादर करण्याची कार्यवाही मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात जायकवाडी व मुळा पाटबंधारे प्रकल्पासाठी संपादन केलेल्या जमिनीबाबत**

**(४०) १२२१४९ (२४-०७-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात जायकवाडी व मुळा पाटबंधारे प्रकल्पासाठी संपादन केलेल्या जमिनीबाबत तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रकल्प अधिकारी यांनी बैठक घेऊन प्रकल्पग्रस्तांशी चर्चा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्यासह त्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चैतन्य बापू आश्रम पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(४१) १२२३७१ (२०-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यटन स्थळ विकास करणेअंतर्गत चैतन्य बापू आश्रम, पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील जीर्ण झालेल्या पुलाचे नुतनीकरण करणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधिनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार जीर्ण झालेल्या पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०३-२०१९) :** (१) होय.

(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०१८-२०१९ अंतर्गत शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, दिनांक १८/२/२०१९ अन्वये चैतन्य बापू आश्रम, पाल (जि.जळगाव) येथील पुलाचे बांधकाम करणे व सभागृह बांधकाम या दोन कामांसाठी रू.१३०.२४ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रू.१५ लक्ष निधी जिल्हाधिकारी, जळगाव यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील महाकाय पुनर्भरण योजना व नदीजोड प्रकल्प राबविण्याबाबत**

**(४२) १२३११० (२०-०७-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुडा पर्वताच्या भागातील भूगर्भातील जलपातळी झपाट्याने खालावत असल्याने याकरिता तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव यांच्या अंतर्गत महाकाय पुनर्भरन योजना व नदीजोड प्रकल्प राबविण्यात येत असून सदरील योजना दर्यापूर (जि.अमरावती) तालुका व लगतच्या खिरकुंड, सावरपानी, गौरखेडा शहानुर ई. मध्यम व लघु प्रकल्पांना जोडण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्यापूर तालुक्यामध्ये महाकाय पुनर्भरन योजना व नदीजोड प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०३-२०१९) :** (१) होय.

(२) महाकाय पुनर्भरण योजनेच्या पूर्व व्यवहार्यता अहवाला Prefeasibility नुसार तापी नदीच्या डाव्या तीरावरील सातपुडा पर्वताचा पायथा ते पूर्णा नदी मधील क्षेत्र अप्रत्यक्ष सिंचनासाठी प्रस्तावित आहे.

महाकाय पुनर्भरण योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी केंद्र शासनाच्या जल संसाधन विभागाच्या आदेशान्वये टास्क फोर्सची स्थापना केली होती. त्यानुसार सदर प्रकल्पाद्वारे प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र ४८,००० हेक्टर, पुर्नभरणाव्दारे अप्रत्यक्ष फायदा होणारे क्षेत्र ३,०९,७८८ हेक्टर व एकूण फायदा होणारे क्षेत्र ३,५७,७८८ हेक्टर आहे.

तापी महाकाय पुनर्भरण योजने अंतर्गत मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यातील सर्व घटकाचे सर्वेक्षण, अन्वेषण तसेच Geophysical aerial survey remote sensing सह इ. कामाच्या रु. २९.९३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि. १२.०५.२०१५ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

महाकाय पुनर्भरण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम विविधतापूर्ण व वैशिष्टयपूर्ण असल्याने सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामासाहित करण्यासाठी WAPCOS या केंद्रशासन अंगीकृत संस्थेशी दि.५.५.२०१६ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (सर्वेक्षण, अन्वेषण व Geophysical study सह) तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

पूर्व व्यवहार्यता अहवालानुसार (P.F.R) दर्यापूर तालुक्यातील गावांना अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होवू शकतो. सदर प्रकल्प सद्य:स्थितीत सर्वेक्षणाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नांदिवसे प्रादेशिक नळपाणी योजनेच्या चुकीच्या वीज देयक आकारणीमुळे वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत**

**(४३) १२४१२८ (३०-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नांदिवसे प्रादेशिक नळपाणी योजनेच्या चुकीच्या वीज देयक आकारणीमुळे थकीत राहिलेल्या वीज देयकामुळे कारणास्तव वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याने या योजनेवरील कळकवणे, वालोटी, ओवळी या तीन गावामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामस्थांनी संबधीत कार्यालयांकडे मागणी करूनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) अध्यक्ष, जिल्हा परिषद, रत्नागिरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी व तसेच वीज वितरण कंपनी अधिकारी यांच्या समवेत दिनांक ९/५/२०१८ रोजी एकत्रित बैठक घेवून फरकाची रक्कम ३८ महिन्यांची असल्याने ती ३८ समान हप्त्यामध्ये विभागून भरणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.दिनांक ११/५/२०१८ पासून योजनेचा पाणी पुरवठा पूर्ववत सुरु करणेत आला आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**पर्यटन विभागाकडून शासकीय जागा खासगी मालक किंवा संस्थांना भाडे तत्वावर किंवा विकत देण्याबाबत**

**(४४) १२४७८३ (२०-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यटन विभागाकडून शासकीय जागा सन २००४ ते २०१४ दरम्यान खासगी मालक किंवा संस्थांना भाडे तत्वाने / विकत / भागीदारी तत्वावर देण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात कोठे कोठे व किती जागा भाडे तत्वाने / विकत / भागीदारीतत्वावर देण्यात आलेल्या आहेत,

(३) असल्यास, सदर जागा भाडे तत्वाने / विकत / भागीदारी दिल्याने शासनाला जागानिहाय्य किती महसूल देण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, सदर भाडे तत्वाने / विकत / भागीदारी दिल्याबाबत काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत काय ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०३-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून जागा भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत.

(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत एकूण २१ ठिकाणच्या मालमत्ता भागीदारी तत्वावर देण्यात आलेल्या आहेत.

(३) उपरोक्त जागा महामंडळाच्या असल्याने महामंडळाने महसूल जमा केला असून शासनास महसूल देण्यात आलेला नाही.

(४) तक्रारी प्राप्त नाहीत.

---

**सांगली जिल्हयातील चांदोली पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याबाबत**

**(४५) १२४८०४ (२०-०७-२०१८). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील चांदोली या परिसरात वारणा प्रकल्पांतर्गत मोठा जलाशय, वनराई, बारमाही वाहणारे झरे व धबधबे तसेच हा परिसर अभयारण्य व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित झाला असल्याने येथे पर्यटन क्षेत्र विकास करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदोली हे मध्यवर्ती ठिकाण पर्यटन क्षेत्रासाठी निवडल्यास सांगली, सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी या परिसरातील नागरिकांना रोजगारांची संधी मिळू शकेल तसेच पयर्टकांची संख्या वाढून शासनाचा महसूल वाढू शकेल,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वने, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल इत्यादी विभागाच्या अधिका-यांसमवेत संयुक्त बैठक घेवून चांदेली परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०३-२०१९) :** (१) ते (४) प्रस्तुत विषयाबाबत मा. मंत्री, पर्यटन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.३.२०१८ रोजी बैठक झाली. सदर बैठकीस मा. स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे व त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**महामंडळांचा एकत्रित तोटा ३७ हजार कोटींच्यावर गेल्याबाबत**

**(४६) १२६५८७ (०५-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध महामंडळांचा आतापर्यंत एकत्रित किंवा संचित तोटा हा ३७ हजार कोटींवर गेला असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २२ तोट्यातील मंडळांपैकी फक्त दोन मंडळे बंद करण्याची प्रक्रिया सुरु असून उर्वरित २० मंडळे बंद करण्याची अद्याप कार्यवाहीच झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वीज बिले वसुली करण्यास दिरंगाई करण्यात आल्याने वीज वितरण कंपनीला १५ हजार कोटींचा तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०३-२०१९)** : (१) एकूण ६६ कार्यान्वित राज्य सार्वजनिक उपक्रमांपैकी ४२ उपक्रम नफ्यात चालत असून उर्वरीत २४ उपक्रम तोट्यात चालत आहेत. राज्यातील सर्व उपक्रमांचा एकत्रित संचित तोटा रू. ३५,२२१.३५ कोटी इतका असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अकार्यान्वित असलेले प्रश्नाधीन २२ उपक्रमांचे परिसमापन करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) व (४) ऊर्जा विभागाच्या माहितीनुसार राज्य शासनाने पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे वित्तिय पुनरर्चना करण्याची हस्तांतरण योजना, दि.७ जून, २००५ रोजी शासन अधिसूचनेद्वारे जाहीर केली होती. तिचे शासन निर्णय दि.३१.०३.२०१६ नुसार अंतिमीकरण झाले व पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मत्तेचे पुनर्मुल्यांकन केले. मत्तांच्या मूल्यातील फरकामुळे, ज्या मत्ता दि.०५.०६.२००५ रोजी हस्तांतरित केल्या, त्यांचा वित्तिय वर्ष २००५-०६ ते २०१४-१५ या कालावधीचा संचित घसारा रूपये १२,४१४ कोटी असून त्यांची नोंद सन २०१५-१६ च्या लेखा पुस्तकात घेतली आहे. या संचित घसाऱ्यामुळे व सन २०१५-१६ या वर्षी महावितरणाला झालेल्या महसूली तोट्यामुळे सन २०१५-१६ या वर्षी महावितरण कंपनीस एकूण रूपये १५,०२१ कोटी इतका तोटा झाला. सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षात नफा झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(४७) १२७४०३ (१०-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७८३७ ग्रामपंचायतीमध्ये सुमारे ६० हजार कर्मचारी कार्यरत असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या मागण्या संदर्भात संघटनेने पाठपुरावा केल्याने १०% आरक्षण १००% वेतन अनुदान इत्यादी मागण्या मंजूर झाल्या परंतु वरील निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणीकरिता संघटनेच्या वतीने लॉगमार्चचे आयोजन करण्यात आले तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करून त्यांना विविध शासकीय सवलती देणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना लोकसंख्येच्या झोननुसार किमान वेतन ५१०० ते ७१०० एवढे दिले जात असून १००% वसुली न झाल्यास शासनाकडून केवळ ५०% वेतन अनुदान दिले जाते व हे अनुदानही ग्रामपंचायती विकासकामांवर खर्च करत असल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दि.२१/१/२००० अन्वये लोकसंख्येनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून सदर कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाच्या खर्चातील ५० टक्के अनुदान शासनामार्फत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

काही ग्रामपंचायतींकडील उत्पन्नाची साधने व आर्थिक परिस्थिती विचारात घेता शासन निर्णय दिनांक ४/३/२०१४ अन्वये ग्रामपंचायतींची लोकसंख्या व उत्पन्न विचारात घेऊन कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के, ७५ टक्के व ५०टक्के असा करण्यात आला आहे. मात्र सदर वाढीव हिश्यास पात्र होण्यासाठी ग्रामपंचायतींनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे फेरआकारणी करणे व गत वर्षात सर्व कराच्या एकूण मागणीची ९० टक्के वसूली करणे बंधनकारक करण्यात आले.

तथापि, ९० टक्क्यापेक्षा कमी वसूली झाल्यास किती वेतन अदा करावे याबाबतची स्पष्टता वरील शासन निर्णयामध्ये नसल्याने, शासन निर्णय दिनांक १७/९/२०१८ अन्वये ग्रामपंचायतीच्या सर्व करांच्या वसूलीच्या टक्केवारीनुसार १०० टक्के, ९० टक्के, ७० टक्के व ५० टक्के किमान वेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३/७/१९९० च्या अधिसूचनेनुसार ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आले आहे. उदयोग, उर्जा व कामगार विभागाकडून सदर किमान वेतनामध्ये ज्या-ज्या वेळी सुधारणा करण्यात येईल, त्या-त्या वेळी ते सुधारित दर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना लागू राहतील असा निर्णय दिनांक ४/३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### मनरेगा अंतर्गत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र MIS प्रणालीवरून कमी करण्याबाबत

**(४८) १२९४५९ (३०-११-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत औसा (जि.लातूर) तालुक्यातील सिंचन विहिरींची कामे अपूर्ण असतानाही सदर कामे पूर्ण झाल्याचे अनावधानाने नोंदविण्यात आल्यामुळे सदर चुकीची दुरुस्ती करण्यासह व सदर विहिरींचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र

MIS प्रणालीवरून कमी करून विहिरींचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दिनांक १९ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किती विहिरींचे प्रस्ताव गटविकास अधिकारी, पंचायत समिती औसा (जि.लातूर) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अपूर्ण विहिरींचे अनावधानाने दाखल करण्यात आलेले पूर्णत्वाचे प्रमाणपत्र MIS प्रणालीवरून कमी करून विहिरींची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासह प्रलंबित देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) नरेगा कक्ष, जि.प.लातूर यांचे पत्र क्र.२०१८/जिपला/मग्रांराग्रारोहयो/कावि-१०२५ दि.२४/१२/२०१८ च्या पत्रान्वये मा.आयुक्त, नरेगा नागपूर यांना पुर्ण कामाचे अपुर्ण कामात रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील हज यात्रेकरुंच्या प्रवास व त्यातील सुविधांवर लावण्यात आलेली वस्तु आणि सेवा कर रद्द करण्याबाबत

**(४९) १२९५४५ (०५-१२-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक भागांतून मुस्लीम भाविक सौदी अरेबियातील हज यात्रेसाठी जात असल्याने हज यात्रेकरुंच्या प्रवास व त्यातील सुविधांवर लावण्यात आलेली वस्तु आणि सेवा कर रद्द करण्याची मागणी अल्पसंख्याक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जुलै,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०३-२०१९) :** (१) होय.
(२) हज यात्रेकरुंचे प्रवास वा त्यातील सुविधांवर लावण्यात आलेल्या वस्तु व सेवा कर रद्द करणेबाबत GST Council च्या ३१व्या बैठकीत चर्चा करण्यात आली. सर्व सहमतीने

घेतलेल्या निर्णयानुसार शासनामार्फत कोणत्याही धार्मिक यात्रेसाठी पुरविण्यात आलेल्या विमान प्रवासावर १८% ऐवजी ५% कर आकारण्यात यावा, असे निश्चित झाले. त्यानुषंगाने केंद्र शासनाने अधिसूचना क्र.२७२०१८ दि.३१.१२.२०१८ रोजी निर्गमित केली. तसेच महाराष्ट्र शासनाने तशीच अधिसूचना क्र. २७२०१८ दि.३१.१२.२०१८ रोजी निर्गमित केलेली आहे.
(३) लागू नाही.

---

**मे.तुळजाभवानी कंन्स्ट्रक्शन, मु.पो.शेनवाडी (ता.खटाव, जि.सातारा) यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(५०) १३००१९ (०६-१२-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग बांधकाम भवन, मुंबई यांचे कडून मे. तुळजाभवानी कंन्स्ट्रक्शन, मु.पो.शेनवाडी (ता.खटाव, जि.सातारा) यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत मा.जलसंपदा राज्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिल्यानंतर उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) व (२) होय, निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे.
परंतू तत्पुर्वी सदर प्रकरणी कार्यवाही सुरू होती. शासन मंजूरीनुसार जिल्हा परिषद सातारा यांचेमार्फत मे.तुळजाभवानी कन्स्ट्रक्शन, मु.पो.शेनवाडी (ता.खटाव, जि.सातारा) यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.